संगणक संकेतांक २०१२१०१११४३६५८०४२५

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १९(२)] मंगळवार, ऑगस्ट २१, २०१२/श्रावण ३०, शके १९३४ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ३३

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**— मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ निरसित करण्यासाठी अधिनियम. | १-४ |

दिनांक १४ ऑगस्ट २०१२ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २१ ऑगस्ट २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ निरसित करण्यासाठी अधिनियम.**

१९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करणे आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ निरसित करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) आणि नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) अधिनियम, २०११ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या संपूर्ण शीर्षकाची सुधारणा.

**२.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या संपूर्ण शीर्षकातील "काही अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" या मजकुराऐवजी "बृहन्मुंबईखेरीज सर्व मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४९ चा मुंबई ५९.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या हेतूवाक्याची सुधारणा.

**३.** महानगरपालिका अधिनियमाच्या, हेतूवाक्यातील "काही अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" या मजकुराऐवजी, "बृहन्मुंबईखेरीज सर्व मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १ ची सुधारणा.

**४.** महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (१) मध्ये "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २ ची सुधारणा.

**५.** महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (८) मध्ये "शहर बनणारे, या अधिनियमाचे कलम ३, पोट-कलम (२) अन्वये अधिक मोठ्या नागरी क्षेत्रांच्या संबंधात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले असे, अधिक मोठे नागरी क्षेत्र" या मजकुरानंतर, "आणि नागपूर शहराच्या संदर्भात, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) आणि नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) अधिनियम, २०११ याच्या प्रारंभाच्या दिनांकास नागपूर शहरात समाविष्ट असलेले क्षेत्र" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०१२ चा महा. २३.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**६.** महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) अन्वये यासंदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये विधिसंस्थापित करण्यात आलेली नागपूर शहर महानगरपालिका ही, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) आणि नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) अधिनियम, २०११ अंमलात येण्याच्या दिनांकास व तेव्हापासून, या अधिनियमान्वये स्थापन केली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार या अधिनियमाच्या तरतुदी नागपूर शहराच्या क्षेत्राला लागू होतील.". १९५० चा मध्यप्रांत व व-हाड २. २०१२ चा महा. २३.

—

प्रकरण तीन

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याचे निरसन.

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. ७. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "नागपूर महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याचे निरसन.

प्रकरण चार

## संकीर्ण

८. नागपूर महानगरपालिका अधिनियमाचे निरसन झाले असले तरीही,— व्यावृत्ती.

(क) नागपूर महानगरपालिका अधिनियमान्वये केलेले सर्व नियम व उपविधी, केलेल्या सर्व नियुक्त्या, काढलेल्या अधिसूचना व दिलेले आदेश आणि दिलेला अनुज्ञप्ती व परवानगी यांत फेरबदल होईपर्यंत, त्यांचे निरसन होईपर्यंत किंवा त्यात सुधारणा करेपर्यंत ते अंमलात असण्याचे चालू राहतील;

१९४९ चा मुंबई ५९. १९४९ चा मुंबई ५९. (ख) नागपूर महानगरपालिका अधिनियमान्वये विधिसंस्थापित केलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेने केलेल्या किंवा निष्पादित केलेल्या सर्व संविदा व करारनामे आणि करावयाच्या सर्व कृती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये स्थापन केल्याचे मानण्यात येणा-या उक्त महानगरपालिकेने, केलेल्या संविदा व करारनामे आहेत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाद्वारे त्याबाबतीत किंवा त्याअन्वये करावयाच्या कृती आहेत असे मानण्यात येईल;

१९४९ चा मुंबई ५९. (ग) नागपूर महानगरपालिका अधिनियमान्वये विधिसंस्थापित केलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेकडे निहित असलेली मालमत्ता, निधी व इतर मत्ता तसेच तिचे सर्व हक्क व दायित्वे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये घटित करण्यात आली असल्याचे मानण्यात आलेल्या उक्त महानगरपालिकेकडे निहित व प्रक्रांत होतील.

१९४९ चा मुंबई ५९. (घ) नागपूर महानगरपालिका अधिनियमान्वये विधिसंस्थापित केलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेला देय असलेले सर्व भाडे, कर व रकमा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३, याच्या पोट-कलम (१क) अन्वये घटित केल्याचे मानण्यात येणा-या उक्त महानगरपालिकेस देय असतील;

(ङ) हा अधिनियम अंमलात येईपर्यंत उक्त महानगरपालिकेद्वारे किंवा तिच्याविरुद्ध अथवा तिच्या आयुक्ताविरुद्ध दाखल केलेले अथवा करावयाचे सर्व दिवाणी किंवा फौजदारी दावे किंवा इतर कायदेशीर कार्यवाही, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महाराष्ट्र १९४९ चा मुंबई ५९. महानगरपालिका अधिनियमान्वये घटित केल्याचे मानण्यात येणा-या उक्त महानगरपालिकेद्वारे किंवा तिच्याविरुद्ध तसेच चालू राहतील किंवा दाखल करण्यात येतील.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९४९ चा मुंबई ५९. १९४९ चा मुंबई ५९. (च) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिती, नागपूर शहर महानगरपालिका यांबाबतचा, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमातील किंवा नियमातील कोणताही निर्देश हा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचा आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये घटित करण्यात आली असल्याचे मानण्यात आलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेचा, निर्देश आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल ;

(छ) नागपूर महानगरपालिका अधिनियमान्वये विधिसंस्थापित करण्यात आलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेचे सर्व पालिका सदस्य, त्यांच्या पदावधीच्या उर्वरित कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये घटित करण्यात आली असल्याचे मानण्यात आलेल्या नागपूर शहर महानगरपालिकेचे पालिका सदस्य म्हणून राहतील. १९४९ चा मुंबई ५९.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

९. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी परंतु उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.